## प्रेस नोट दिनांक ०८/०६/२०१९

## पार्क केलेल्या मोपेड गाडीच्या डिक्कीतील किंमती मोबाईल चोरणारे चोरटयास उत्तमनगर पोलीसांनी चार तासात रंगेहाथ पकडले.

उत्तमनगर पोलीस स्टेशन पुणे येथे गुन्हा रजि. न. ५८/२०१९ भादवि कलम ३७९, ३४ मधील फिर्यादी नामे योगेश जयंत दौंडकर वय- ३५ वर्षे धंदा- व्यवसाय रा- ११०/१०३५ गोखलेनगर, पुणे -१६ हे दिनांक- ०३/०६/२०१९ रोजी खडकवासला धरण परिसरात त्याची ज्युपीटर मोपेड क्र. एम. एच- १२- एल.आर- ३९४३ ही पार्क करुन धरण क्षेत्रात जाणार असल्याने मोबाईल व कागदपत्र मोपेडच्या डिक्कीत ठेवून डिक्की व मोपेड लॉक करुन काही अंतरावर धरण क्षेत्रात गेले होते. त्यानंतर १६/०० वा. चे सुमारास ते परत आले असता त्याचे मोपेडजवळ त्यांना दोन मुले त्यांची डिक्की उघडत असल्याचे लांबून दिसले. म्हणून त्यांनी काय करता रे असा आवाज दिला असता सदर मुलांनी त्यांचे मोपेडमध्ये ठेवलेले जॅकेट व मोबाईल घेवून पळून जावू लागल्याने फिर्यादी यांनी त्यांचा पाठलाग केला असता सदर मुले झाडा झुडपांचा फायदा घेवून पसार झाले. त्यानंतर फिर्यादी यांनी उत्तमनगर पोलीस स्टेशन पुणे येथे येवून मोबाईल चोरुन घेवून गेलेल्या मुलांच्या वर्णनासह त्यांचे विरुध्द मोबाईल चोरीची फिर्याद दिली.

त्यानंतर सदर गुन्ह्यातील चोरीस गेले मोबाईलचा व फिर्यादीने दिलेल्या वर्णनाचे आरोपींचा शोध घेणेकामी पोलीस उप निरीक्षक, के. के. कांबळे, पो.हवा.२४१८ सूर्यवशी, पो.ना. ६७०६ तनपुरे, पोशि/८५९२ त्रिंबके, पोशि/८१५९ ताकवणे यांचेसह हद्दीत शोध घेत असताना त्यांना २०/१० वाजताच्या सुमारास नवभारत हायस्कुल चौक शिवणे पुणे या ठिकाणी फिर्यादीने दिलेल्या वर्णनाची दोन मुले पायी पायी वारजेकडे जाता असताना दिसल्याने त्यांना हटकले असता ते सदर ठिकाणाहून पळून जावू लागली. म्हणून त्यांनी सदर मुलांना स्टाफच्या मदतीने थोडयाच अंतरावर पकडले. सदरची दोन्ही मुले ही अल्पवयीन असून त्यांचे वय १३ वर्षे आहेत. त्यांची दोन पंचासमक्ष झडती घेतली असता त्यांचे ताब्यात फिर्यादीचा मोबाईल वन प्लस कंपनीचा कि. रुपये २५०००/-चा मिळून आलेला आहे. ते गुन्ह्याचे पुरावेकामी जप्त करण्यात आला आहे. सदर विधी संघर्षग्रस्त बालकांकडून  उत्तमनगर पोलीस स्टेशन गुन्हा रजि नं. ५८/२०१९ भादवि कलम ३७९,३४ हा चार तासात उघडकीस आणला असून सदर विधी संघर्षग्रस्त बालकांना त्यांचे पालकांच्या ताब्यात देण्यात आलेले आहे.

## प्रेस नोट दिनांक ०५/०६/२०१९

**विषय :- तीन महिन्यापासून फरार आरोपी शिताफिने पकडून**

**दाखल गुन्ह्यात अटक करण्यास उत्तमनगर पोलीसांना यश.**

उत्तमनगर पोलीस स्टेशन पुणे येथे गुन्हा रजि. न. ३९/२०१९ भादवि कलम ३२६,३४ मधील फिर्यादी नामे सौ.संगिता कृष्णा मानकर वय ४० वर्षे रा.न्यू कोपरे गाव ता.हवेली जि.पुणे यांचा मुलगा शुभम व शिंदे पूल शिवणे येथील नारळ विक्रेता यांचेमध्ये झालेले भांडणाचे कारणावरुन दिनांक ४/४/२०१९ रोजी रात्रौ २३.३० वाजता फिर्यादीचे घरी गणेश वाघमारे व चेत्या चव्हाण व त्यांचे मित्र यांनी शुभम कृष्णा मानकर यास धारदार शस्त्राने दोन्ही पायावर,व डाव्या हातावर वार करुन जबर दुखापत केली. गुन्हा केल्यापासून मारहाण करणारे सर्वजण पळून गेले होते.त्याचा सर्वत्र शोध घेण्यात येत होता.परंतू ते वारंवार पोलीसांना गुंगारा देण्यात यशस्वी झाले होते.

दिनांक ५/६/२०१९ रोजी ११.१५ वाजता वरील गुन्हयातील आरोपी नामे १.चेतन लक्ष्मण चव्हाण रा.शिवणे पुणे, २. दिनकर किसन वांजळे रा.न्यू कोपरे ता.हवेली जि.पुणे, ३. प्रसन्न मनोज कदम रा.राहुलनगर शिवणे पुणे यांना शिताफिने पो.उपनिरीक्षक श्री.कांबळे व त्यांचे स्टाफने पकडून गुन्हयात अटक केली आहे.

प्रेस नोट दिनांक १७/०९/२०१८
गॅस वितरण टेम्पो चालकाची नजर चुकवून सिलेंडर
चोरणारे चोरटयास उत्तमनगर पोलीसांनी पकडले.

दिनांक- १३/०९/२०१८ रोजी गणेश चतुर्थी (गणेश उत्सवाचा) बंदोबस्ता निमित्त तपास पथकाचे पोलीस उप निरीक्षक श्री के. के. कांबळे, तसेच सपोफौ. वायंदेडे पो हवा सुर्यवंशी पो ना पाटील, तनपुरे पो शि त्रिंबके, ढमढेरे, ताकवणे तसेच शिवणे मार्शल डयुटीचे कर्मचारी पो ना मिसाळ, पो शि राऊत असे उत्तमनगर पोलीस स्टेशन हद्दीत कोणताही अनुचित प्रकार घडू नये या करीता पेट्रोलींग करीत होते.

त्यादरम्यान त्यांना नवभारत शाळा ते स्मशान भुमी शिवणे नांदेड सिटी रोडवर पेट्रोलींग करीत असताना १९/०० वा. चे सुमारास एक काळया रंगाची टीव्हीएस ज्युपीटर तिला आरटीओ नंबर नसलेली दिसली सदर दुचाकीवर एक इसम त्याचे दोन्ही पायाचेमध्ये एक सिलेंडर व त्याचे पाठीमागे बसलेल्या मुलीकडे एक असे दोन गॅस सिलेंडरसह दिसले. इकडील पोलीस स्टेशनचे हद्दीत गॅस सिलेंडर चोरीचे गुन्हयात मिळालेल्या सीसीटीव्ही फुटेज मधील आरोपीबाबत त्यांना संशय आल्याने त्यांनी त्यास थांबवून त्यास त्याचे नांव पत्ता विचारता त्याने त्याचे नांव संजय चंद्रकांत गिजरे वय- ४५ वर्षे रा- सर्वे नं. ३४ शिवशंकर चौक शिवशंकर बिल्डींग मोहननगर धनकवडी पुणे ४३ असे सांगितले. त्याचे पाठीमागे एक अल्पवयीन मुलगी वय- १६ वर्षे ही बसलेली होती. त्याचेकडे असलेल्या वाहनाचे कागदपत्रांचा तसेच त्यांचेजवळ असलेल्या दोन गॅस सिलेंडरबाबत चौकशी करता तो उडवाउडवीची व असमाधानकारक उत्तरे देवू लागला त्यास पोलीस स्टेशन येथे आणुन दाखल गुन्ह्याचे प्राप्त सीसीटीव्ही फुटेज दाखविले असता त्याने सदरचा गुन्हा केल्याची कबुली दिली. त्यास उत्तमनगर पोलीस स्टेशन गुन्हा रजि नं. ८२/२०१८ भादवि कलम ३७९,३४ मध्ये अटक करण्यात आली. त्याचेकडे केले तपासामध्ये तो गॅस सिलेंडर डिलीव्हरी बॉय हे गॅस सिलेंडर देण्यासाठी बिल्डींगमध्ये गेल्यानंतर त्याची नजर चुकवुन त्याने पार्क केलेल्या टेम्पोतून गॅस सिलेंडर चोरुन नेत होता. त्याने शिवणे, न्यु अहीरेगाव सिंहगड कॉलनी, शिवपार्वती बिल्डींग, काकडे टेरेस सोसायटी,पॉप्युलर कॉलनी, अतुलनगर, गोकूळनगर, पॉप्युलरनगर / गिरीधरनगर रेणुकानगर निरंजन प्रेस्टीज सोसायटी, वारजे नाका येथील तिरुपतीनगर सोसायटी वारजे पुणे तसेच सर्वत्र सोसायटी, अंनत कृपा सोसायटी पौड रोड कोथरुड पुणे तसेच लालगोलीसा सोसायटी, सैनिकवाडी, वडगांव शेरी पुणे इत्यादी ठिकाणाहून गॅस सिलेंडर चोरी केल्याचे कबुल करुन त्याने भारत पेट्रोलीयम, हिंदूस्थान पेट्रोलियम व इंडेन गॅस कपंनीचे असे एकूण- २७ गॅस सिलेंडर काढून दिले. सदर आरोपीकडून उत्तमनगर पोलीस स्टेशन ०१ गुन्हा, वारजे पोलीस स्टेशन ०२ गुन्हे, कोथरुड पोलीस स्टेशन ०१ गुन्हा, व येरवडा पोलीस स्टेशन ०१ गुन्हा असे एकूण- ०५ गुन्हे उघडकीस आले असून सदर आरोपीकडून ज्युपीटर दुचाकी व २७ गॅस सिलेंडर असा सर्व मिळून ७७,३३०/- रुपये किंमतीचा माल हस्तगत केला आहे.

सदरची कारवाई मा. श्री. रविंद्र सेनगांवकर अपर पोलीस आयुक्त पश्चिम प्रादेशिक विभाग पुणे शहर, मा. श्री. मंगेश शिंदे, पोलीस उप आयुक्त, परीमंडळ ३ पुणे शहर, मा.श्री. बाजीराव मोहिते, सहा. पोलीस आयुक्त कोथरुड विभाग पुणे शहर यांचे मार्गदर्शनाखाली उत्तमनगर पो.स्टे पुणे चे वरीष्ठ पोलीस निरीक्षक श्रीमती अनघा देशपांडे, पोलीस निरीक्षक (गुन्हे) सतिश डहाळे, तपास पथकाचे पोलीस उप निरीक्षक के.के.कांबळे, स.पो.फौ. वायदंडे, पो.हवा.सुर्यवंशी,पो.ना. मिसाळ, तनपुरे, पाटील पो शि राऊत , ढमढेरे, ताकवणे, त्रिंबके यांनी पार पाडली आहे.

ता. १७/०९/२०१८

वरिष्ठ पोलीस निरीक्षक
उत्तमनगर पोलीस स्टेशन पुणे